राजकीय नेतृत्वाचे अध्ययन : विशेष संदर्भ राजीव सातव

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठ,नांदेड

येथील मानवव्यविज्ञान विदयाशाखे अंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

-:: संशोधक ::-

वागदकर गजानन शंकर

एम.ए.सेट,बी.एड्

-:: मार्गदर्शक ::-

सहयोगी प्रा.डॉ.व्ही.आय.पाटील

संशोधन मार्गदर्शक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख

संभाजी केंद्रे महाविदयालय,जळकोट

ता.जळकोट जि.लातूर

प्रस्तावना :

कोणत्याही समाज व्यवस्थेत कल्पना आणि विचारसरणी आणि त्या समाजातील एकता पुर्ण सामाजात रुजवण्यासाठी त्या समाजातून एखादे नेतृत्व उभे राहण्याची गरज असते म्हणून ग्रीक अरिस्टॉटल विचारवंत यांनी म्हटले आहे की माणूस हा समाजशील प्राणी आहे आणि तो समाजाशिवाय राहू शकत नाही.

कारण समाजात वावरतांना त्यांना अनेक समाजभिमुख गोष्टी कराव्या लागतात आणि त्यातील महत्वाचा घटक म्हणजे नेतृत्व होय. आपल्या समाजातील रुढी परंपरा संस्कृती या जोपासण्यासाठी त्या समाजातून एक नेतृत्व म्हणून उदयास येणे गरजेचे असते. आणि पुढे चालून व्यक्ती व्यक्ती मध्ये अनेक संबंध वाढत गेले आपण जर बघितले की प्राचीन काळात सुध्दा अनेकांनी संघटन निर्माण करुन त्या ठिकाणी त्यांनी नेतृत्व उभे केले होते त्यामुळे नेतृत्व हा शब्द समाजातील सर्व लोकांना तो परिचित झाला आणि आपण जर बघितलं तर आजतागायत अनेक समाजांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात त्या ठिकाणी लोकांनी नेतृत्व उभे केले आहे.

अशाच प्रकारे ही परंपरा पुढे चालत आली आणि 20 व्या शतकात सुध्दा या नेतृत्वाच्या माध्यमातून सामाजिकशास्त्राचा विकास होत गेला आणि त्यातून एक जगापुढे नेतृत्व हा सिध्दांत निर्माण झाला त्यातून सामाजिक उद्दिष्टे व सामूहिक जीवनाच्या दृष्टीने नेतृत्वाची भूमिका ही फार महत्वाची आहे. त्यातून एक जूट राहणे आणि तो सुखी ठेवणे व समूहाच्या प्रयोजन पोषक अशी विभागणी करणे सर्व व्यक्तींमध्ये सुसंवाद साधणे व सर्वांचे समाधान करणे ही जबाबदारी राजकीय नेतृत्व यावर अवलंबून असते. अशाच प्रकारे राजकीय नेतृत्वाचे अध्ययन यात मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्यातील ज्याने एक नेतृत्व उभे केले आणि लोकांच्या संपर्कात राहून त्या लोकांसोबत राहून त्यांनी एक समाजाभिमूख नेतृत्व उभे केले असे राजीव सातव यांच्या राजकीय नेतृत्वाबद्दल अभ्यास करावयाचा आहे. त्यांनी कशा प्रकारे राजकीय नेतृत्व उभे केले. त्यांची सविस्तर माहिती यामध्ये समाविष्ट करणार आहोत. आपण जर पाहिलतर त्यांनी सुरुवातीला फार ग्रामीण भागातून नेतृत्व करण्यास सुरुवात केली आणि समाजासोबत राहून त्यांनी एक नेतृत्व उभे केले. ते या नेतृत्वाच्या जोरावर राजकारणात सक्रिय झाले आणि त्यांनी अनेक पदे भुषविले आहेत. त्यांनी भारतीय राजकारण तसेच महाराष्ट्रातील राजकारणात ज्या प्रकारे सक्रिय सहभाग नोंदवून त्यांनी फार कमी वयात त्यांनी राजकीय राजकारणात मोठी छाप निर्माण केली होती. त्यांची राजकीय कारकीर्द यांचे अध्ययन आपण या संशोधन विषयात समाविष्ट करणार आहोत.

राजकीय पार्श्वभुमी :

आपण जर बघितलं तर प्राचीन काळ आदिमानवाचा तर ऐतिहासिक काळा हा मानवी विकासाचा आणि तो उत्क्रांतीवाद गतीने मानवाचा विकास होत गेला. मानवी संस्कृतीचा विकास होत असताना माणुस सुरुवातीच्या काळात हळूहळू नदीकाळी स्थिरावला आणि त्यानंतर अग्नीचा

शोध लागला प्राचीन काळी माणूस एकटाच राहत भटकंती करता होता. पण नंतर तो घर बांधून समाजसोबत राहू लागला. आणि त्यातून टोळ्या निर्माण झाल्या आणि त्या टोळ्या भूमीच्या अस्तित्वासाठी लढू लागल्या. त्यातून पुढे व ज्यांचे राज्य उदयास येऊ लागले आणि आपल्या राज्यासाठी प्रदेशासाठी त्यांनी नेतृत्व उभे केले त्यातून अनेक राजकीय विचारवंताने राज्यकर्त्यांच्या सिध्दांत विषयी अथवा विकाससंबंधी अनेक विचारवंतांचे अनेक मते आहेत.

प्रकर्षाने राज्य उत्पत्तीच्या दैवी सिध्दांत उत्क्रांतीवादी सिध्दांत ऐतिहासिक सिध्दांत सामाजिक कराराचा सिध्दांत उदयास येऊन राज्य उत्पत्ती संबंधी अध्ययन होऊ लागले. परंतु हे अध्ययन संदिग्ध आहे. काही प्रमाणात राज्य निर्माण होऊन त्यास राजकीय नेतृत्व निर्माण होऊन पुढील राजकीय नेतृत्व या संबंधित बाबीचे विवेचन करावयाचे वाटते व कौटिल्यांनी राजविद्येचे महत्व सांगताना अन्विसीकी वेदत्रयी वार्ता या तिने त्याचा उहापोह केला या तिने विविध यांना संरक्षण व शास्वती प्राप्त होते ती दंडनितीने यालाच राजविद्या म्हटले आहे. भौतिक जगाचा संपूर्ण व्यवहार याच विद्यावर अवलंबून असतो. अशा प्रकारे राजकीय व्यवहार यांची व्यापक व शास्त्रीय मीमांसा कौटिल्यांनी केली व अरिस्टॉटलने देखील राज्यशास्त्राला प्रमुख शास्त्र म्हटले आहे. प्लेटोने आपल्या जगप्रसिध्द रिपब्लिक या ग्रंथामध्ये आदर्श राज्य व आदर्श राजा या संबंधी विचार मांडले. आधुनिक राज्यशास्त्र जनक मॅकवली या इटालियन विचारवंताने आपल्या सुपसिध्द द प्रिन्स या ग्रंथांमध्ये राजा व राज्य या राजकीय शब्दांचा विस्तृत विवेचन केले आहे. राजाने कोल्हासारखे धुर्त सिंहासारखे शूर असावे. राज्य टिकवणे वाढविणे हा उद्देश समोर ठेवून राज्यकारभार करावा. असे आधुनिक विचारवंता पैकी असलेले डाल्व लासवेल कपलान यांनी शक्तीच्या दृष्टिकोनातून राज्यशास्त्राची मीमांसा केली आहे. डॉल म्हणतो की शक्ती शासन प्रक्रिया व सत्ता यांच्याशी संबंधित विश्लेषण राज्यशास्त्रात होते. तर लॉसवेल म्हणतो की कुणाला केव्हा व कसे राज्य व नेतृत्व मिळते याचा शोध राज्यशास्त्रात होतो.

थोडक्यात सत्यसंबंधी माणसाचे व्यवहार म्हणजे राजकीय होय, यावरुन राजकीय संकल्पना बहुआयामी व व्यापक आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे आर्थिक सामाजिक धार्मिक राजकीय अशा भिन्न शब्दांमधून राजकीय असे विभाजन करता येत नाही. कित्येक धार्मिक व आर्थिक घटकाचे परिणाम आर्थिक किंवा धार्मिक होऊ शकतात. म्हणुन राजकीय ही संकल्पना प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे हे सदरील राजकीय विचारवंताच्या मतांनी स्पष्ट होताना दिसते.

नेतृत्व :

जेव्हा काही व्यक्ती एकत्र येतात विशिष्ट उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून ते उद्दिष्ट गाठण्याकरीता करता योजनाबध्द प्रयत्न करावे लागतात. तेथे नेतृत्वाचा प्रश्न उद्‌भवतो आणि नेतत्वाची आवश्यकता जाणवते. व्यक्तीच्या या एकत्र येणाऱ्या समूहाला जर योग्य नेतृत्व प्राप्त झाले तर

त्या समूहाला योग्य दिशा मिळण्याचे काम या नेतृत्वाच्या माध्यमातून होत असते आणि सर्व शक्ती त्या दिशेने वळविली जाऊ शकते. साधनांचा उत्कृष्ट उपयोग संभवतो पूर्वनिर्धारित धोरणे व्यवस्थितपणे राबवली जातात योजनांची कार्यक्षमपणे अंमलबजावणी करुन प्रत्येक समूहामध्ये नेतृत्वाचे कार्य एखादी व्यक्ती जाणीवपूर्वक करीत असते. नेतृत्वाशिवाय समूहाची कल्पना करता येईल. परंतू हा आपली उद्दिष्टे घटनेमध्ये कधीही यशस्वी होत नाही. लोकशाही प्रणालीमध्ये नेता आणि नेतृत्व यास अनन्यसाधारण महत्व आहे. विशेषता पंचायत राज संस्था मध्ये नेत्यास अधिक महत्व आहे आणि आपण जर बघितले तर समाजात अनेक नेतृत्व करणारे असतात. पण त्यातील काही नेतृत्व करणारे समाजासाठी काही तरी करायचे यासाठी ते नेतृत्व करीत असतात. पंचायतराज संस्थांमध्ये नेतृत्व करणारे ग्रामीण विकासाचा केंद्रबिंदू आहे आणि समाजामध्ये राजकीय सामाजिक व तांत्रिक बदल घडवून आणण्यात राजकीय नेतृत्वाचा सिंहाचा वाटा असतो. शासकीय व निमशासकीय योजना गावपातळीवर राबवून याविषयी लोकांना जागृत करणे. प्रोत्साहित करणे विकास प्रक्रियेत उद्युक्त करणे हे त्यांचे प्रमुख कार्य आहे. या कार्याच्या माध्यमातून हे नेतृत्व उभे राहत असते.

नेतृत्वाची व्याख्या :- नेतृत्वाची संकल्पना फार जुनी आहे. मानवी जीवनाच्या निर्मितीबरोबरच नेतृत्वाच्या कार्याची गरज भासू लागली. उदा. अनेक फल तोर्‍यामध्ये आल्यानंतर हार तयार होतो. त्याच प्रमाणे अनेक व्यक्ती एकत्र येऊन संघटन निर्माण केल्याने नेतृत्व तयार होते. या उद्देशाने अनेक विचारवंतांनी वेगवेगळया प्रकार नेतृत्वाच्या व्याख्या केल्या आहेत.

हेपेल :- या शास्त्रज्ञांनी नेतृत्वाची व्याख्या अशी केली आहे. नेतृत्व म्हणजे एका व्यक्तीचे अथवा अनेक व्यक्तींचे गट रचनेतील व कार्यातील स्थान जे गटाचे हेतू व गरजा भागविण्याकरीता कामी येते की कार्य गटातील सदस्यांच्या सहकार्याने पूर्ण होते.

जॉर्ज टेरी :- यांनी नेतृत्वाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. नेतृत्व म्हणजे लोकांना प्रभावित करुन पारंपारिक उद्दिष्ट गाठता यावीत याकरिता प्रयत्न करण्यासाठी प्रवृत्त करण्याची क्षमता होय.

हॉकर व गिब्सन :- यांच्या मते नेतृत्व म्हणजे असे संबंध जे गटात अस्तित्वात आहेत व त्यांच्या प्रभावाने एक व्यक्ती इतर व्यक्ती वर एखाद्या सामान्य हेतू साध्य करण्या करीता परिणाम घडवते.

सॉथ आणि जॉन्सन :- यांच्या मते औपचारिक किंवा अनौपचारिक परिस्थितीमध्ये इतरांच्या प्रवृत्तीला व वागणुकीला आकार देण्याची योग्यता म्हणजे नेतृत्व होईल.

संशोधन विषयाची निवड :

राजकीय नेतृत्व या संशोधन विषयात महाराष्ट्राच्या राजकारणातील काही राजकीय व्यक्तीचे नेतृत्व त्या व्यक्तीचा स्वतंत्रपणे अभ्यास करता यावा व आजपर्यंत फारच थोड्या संशोधकांनी यात संशोधन केले आहे. परंतु राज्यशास्त्र संशोधकांनी या अशा विषयाकडे दुर्लक्ष केले आहे. हे मान्यच करावे लागेल म्हणून महाराष्ट्राच्या राजकारणातील अनेक राजकारणी होऊन गेले. त्यांनी वेगवेगळ्या भागात त्यांनी नेतृत्व केले. त्यांनी केलेले नेतृत्व त्यांनी दिलेले योगदान यांची जाणीव व माहिती व्हावी म्हणून राज्यशास्त्र संशोधकांनी या क्षेत्रातील उणीव दूर करावी या उद्देशाने मी राजकीय नेतृत्वाचे अध्ययन या संशोधन विषयात राजीव सातव यांनी केलेल्या नेतृत्व याबद्दल त्यांनी फार कमी वयात राजकारणात आपले नाव कमावले. राजकारणाचा राजकीय नेतृत्वाच्या माध्यमातून त्यांनी अनेक मोठी कामे केली आणि जनतेच्या सेवेसाठी तत्पर होते. त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल व त्यांनी केलेले कार्य या अशाच प्रकारचे भविष्यात नेतृत्व उभे राहावे या उद्देशाने मी या संशोधन विषयाची निवड करत आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अध्ययनासाठी खालील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

1. राजीव सातव यांच्या राजकारणातील संघर्षमय जीवनाचा वेध घेणे.
2. राजीव सातव यांच्या समाजकारणाचा व राजकारणाचा अभ्यास करणे.
3. राजीव सातव यांचे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षातील नेतृत्वाचा अभ्यास करणे.
4. राजीव सातव यांनी पंचायत समिती सदस्य जिल्हा परिषद सदस्य विधानसभेचे आमदार व संसदेचे खासदार म्हणून केलेल्या नेतृत्वाचा अभ्यास करणे.
5. राजीव सातव यांनी वेगवेगळया भागात केलेल्या नेतृत्वाचा अभ्यास करणे.

ग्रहितके :

प्रस्तुत संशोधन विषयासंबंधी संशोधकांनी खालील गृहितके निश्चित केली आहेत.

1. राजीव सातव यांच्या राजकारणातील जीवन प्रवास हा खडतर परिस्थितीतून पुढे आला आहे.
2. राजीव सातव यांचे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात महत्वाचे स्थान होते.
3. राजीव सातव यांची सामाजिक, राजकीय व शैक्षणिक कार्यात महत्वाचे योगदान आहे.
4. राजीव सातव यांनी वेगवेगळी पदे भूषवली आहेत.
5. राजीव सातव यांचे महाराष्ट्रातील नेतृत्वात महत्वाचे स्थान होते.

संशोधनाचे महत्व :

प्रस्तुत राजकीय नेतृत्वाचे संशोधन विषयात राजीव सातव यांच्या आयुष्याच्या राजकीय नेतृत्वाचा अभ्यास रेखाटला आहे. त्यांचे पूर्व नेतृत्व लक्षात घेण्याकरता शोधप्रबंधाचा उपयोग होईल. पण त्याशिवाय त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात त्यांनी स्वीकारलेली विकासात्मक भूमिका व केलेले कार्य समजण्यास मदत होईल. भारताचे समकालीन राजकारण असो की महाराष्ट्राचे राजकारण त्यात त्यांनी पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न व त्यांनी या नेतृत्वाच्या जोरावर वेगवेगळ्या ठिकाणी सदस्य म्हणून कार्य केले आहे. त्यात त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्था असो कि विधानसभा, लोकसभा, राज्यसभा यात त्यांनी खूप चांगल्या प्रकारे नेतृत्व केले आहे. त्याचबरोबर त्यांनी अधिवेशन काळात खूप चांगल्या पध्दतीने जनतेचे प्रश्न मांडले आहेत. कारण ते एक अभ्यासू नेतृत्व म्हणुन त्यांच्याकडे पाहिले जात होते. त्यांनी गटातटाच्या राजकारणा पलिकडे जाऊन विकासात्मक राजकारणावर भर दिला. या राजकीय नेतृत्वाचे योगदान या संशोधनातून राजीव सातव यांनी राजकीय दृष्ट्या दिलेले महत्वपूर्ण योगदान त्यामुळे या संशोधनाला वेगळे महत्व प्राप्त आहे.

संशोधनाचे अभ्यासक्षेत्र :

या संशोधन कार्यात वस्तुनिष्ठता येण्यासाठी व संशोधन वास्तव प्रत जाण्यासाठी संशोधनाचे क्षेत्र निश्चित करावी लागते. संशोधनाचे मर्यादित क्षेत्र हे क्षेत्र वास्तव प्रत पोहोचविले म्हणून संशोधकांनी राजकीय नेतृत्वाचे अध्ययन विशेष संदर्भ राजीव सातव यांचे राजकीय नेतृत्वाचे अध्ययन या विषयाच्या अभ्यास करताना यात राजीव सातव यांनी त्यांच्या कार्यकाळात केलेल्या नेतृत्वाचा विचार केला जाणार आहे. तर या शोधकार्यात क्षेत्र भारतातील राजकारण त्याचबरोबर महाराष्ट्रातील राजकारणात व स्थानिक स्वराज्य संस्था व सामाजिक कार्यात त्यांनी केलेले नेतृत्व याचा अभ्यास या संशोधन विषयात केला जाणार आहे.

संशोधन पध्दती :

राजकीय नेतृत्वाचे अध्ययन विशेष संदभ राजीव सातव यांच्या राजकीय नेतृत्वाचे अध्ययन या विषयाच्या अनुषंगाने राजकारणातील राजकीय नेतृत्वातील योगदान व त्यांचा सहभागाचा अभ्यास करण्यासाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब केला जाईल.

तथ्य संकलन :

तथ्य संकलनाच्या दोन पध्दती आहेत. त्याआधारे प्रस्तुत संशोधन विषयात प्राथमिक व दुय्यम साधने यांचे संकलन केले जाणार आहे. या संकलित केलेल्या तथ्याच्या आधारे विश्लेषण करण्यात येणार आहे.

प्राथमिक स्त्रोत : प्राथमिक साधनांमध्ये विशेषता अनुभवजन्य पध्दतीचा वापर केला जाईल यात राजीव सातव यांच्या परिवारातील व सोबतच्या लोकप्रतिनिधीच्या मुलाखती, प्रश्नावली व अनुसुची भरुन घेऊन त्यांच्याशी चर्चा विनिमय करुन तथ्य संकलन करण्यात येईल.

महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेले दस्तवेज.

पूर्व संशोधकाचे एम.फिल, पी.एच.डीचे प्रकाशित व अप्रकाशित ग्रंथ

दुय्यम स्त्रोत :

व्दितीय साधनामध्ये शासकीय अहवाल, मासिके, वृत्तपत्रे, विधिमंडळ कामकाजाचे लेखी संदर्भ ग्रंथ, शोधपत्रिका, विशेषांक, नियतकालिके, वृत्तमानपत्रे, पुस्तके व इंटरनेटचा उपयोग इत्यादी दस्ताऐवजाचा आधार घेतला जाईल.

तथ्याचे विश्लेषण :

प्रस्तुत संशोधन विषयात संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्याचे संकलन केले जाणार आहे. या संकलित केलेल्या तथ्याचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

संशोधन आराखडा :

प्रस्तुत संशोधन विषयाचा आराखडा तयार करताना या विषयाची मांडणी व पैलू लक्षात घेता अभ्यासाकरीता या संशोधन विषयाची मांडणी सात प्रकरणात करण्यात आली आहे.

प्रकरण पहिले :-

प्रस्तावना :

पहिल्या प्रकरणां मध्ये राजकीय नेतृत्वाची पार्श्वभूमी राजकीय म्हणजे काय नेतृत्व म्हणजे काय नेतृत्वाची व्याख्या त्याचबरोबर संशोधन विषयाची निवड संशोधनाची उद्दिष्टे संशोधनाचे महत्व संशोधनाची ग्रहितके संशोधन पध्दती तथ्य संकलन तथ्य विश्लेषण शस्त्र व संशोधन आराखडा इत्यादी घटकांचे विवेचन करण्यात येईल.

प्रकरण दुसरे :

संशोधना पूर्वी / संदर्भ साहित्याचा आढावा :

प्रस्तुत संशोधनकांनी आपल्या संशोधनासाठी राजकीय नेतृत्वाचे अध्ययन यात विशेष संदर्भ : राजीव सातव यांच्या राजकीय नेतृत्वाचे अध्ययन हा अभ्यास विषय निवडला आहे. या विषयांच्या अनुषंगाने कोणाचे संशोधन झाले आहे का या विषयावर पूर्व आढावा घेण्यात येत आहे.

नाबदे महादेव वैजनराव : डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांचे राजकीय नेतृत्व एक अभ्यास पीएचडी प्रबंध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड 2013.

या संशोधनातून डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या राजकीय नेतृत्वाचा अभ्यास असल्यामुळे 1957 च्या विधानसभा निवडणुका पासून ते 2012 पर्यंत विधानसभेचे आमदार, मंत्री, मुख्यमंत्री म्हणुन केलेले कार्य पक्ष संघटनेतील योगदान तसेच त्यांनी नेतृत्व गुणावर विविध पातळीवर राजकीय विकासात योगदान आणि सबलीकरणात दिलेले योगदान यावर अभ्यास करण्यास भर दिला आहे.

कैलास बनसोडे : इंदिरा गांधीचे भारतीय राजकारणातील योगदान पी.एचडी प्रबंध डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

या संशोधनातून इंदिरा गांधीच्या पंतप्रधान पदाच्या कालखंडात त्यांनी भारतीय राजकारणात दिलेले योगदान त्यांची कार्यशैली निर्णय क्षमता नेतृत्व गुण तसेच विरोधी पक्षा बरोबरची त्यांची राजकीय नीती व एकाधिकारशाही प्रवृत्ती मंत्रिमंडळावर त्यांचा दबाव इत्यादी प्रकर्षाने जाणवलेली या बाबी या अभ्यास प्रस्तुत प्रबंधातून करण्यात आला आहे.

डॉ.सुदर्शन मोरे : यांनी राजकीय नेतृत्वाचे विश्लेषणात्मक अध्ययन विशेष संदर्भात श्री विलासराव देशमुख यांच्यावर राजकीय नेतृत्वाचा दृष्टिकोनातून संशोधनात्मक कार्य केले आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड 2004.

या संशोधन विषयात विलासराव यांचे राजकीय जीवनातील योगदान त्यांनी ग्रामीण भागातून सरपंच ते आमदार, मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री यांच्या नेतृत्वाचा अभ्यास या संशोधक कार्यात विश्लेषणात्मक केलेला दिसून येतो.

डॉ.शेषेराव शेट्टे : यांनी शिवराज पाटील चाकूरकर यांचे राजकीय नेतृत्व या विषयावर पी.एच.डी प्रबंध स्वामी रामानंद तीर्थ, मराठवाडा विद्यापीठ, नांदेड 2005.

या संशोधन कार्यात शिवराज पाटील चाकूरकर यांनी त्यांच्या नेतृत्वाच्या जोरावर वेगवेगळी पदे भूषवली. त्यांचा व त्यांनी भारतीय राजकारणात व महाराष्ट्राच्या राजकारणात केलेले नेतृत्व यांचा अभ्यास या संशोधन कार्यात दिसून येतो.

प्रकरण तिसरे :-

राजीव सातव यांच्या राजकीय नेतृत्व कार्याचा अभ्यास :-

प्रस्तुत प्रकरणांमध्ये राजीव सातव यांनी महाराष्ट्राच्या व भारताच्या राजकारणात कशा प्रकारे योगदान दिले आहे. याबाबतची भूमिका काय आहे हे स्पष्ट करण्यात आले आहे. एकूणच त्यांच्या राजकारणात कधी पासून सुरुवात झाली आहे याचा अभ्यास यात करण्यात आला आहे व त्यांच्या राजकारणाचा श्रीगणेशा हा पंचायत समिती सदस्य या नेतृत्वा पासून झाला आहे. त्यांनी पुढे जाऊन जिल्हा परिषद सदस्य, आमदार, खासदार, युवक काँग्रेस राष्ट्रीय अध्यक्ष, गुजरातच प्रभारी आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ते निमंत्रित सदस्य म्हणून त्यांनी भारतातील व महाराष्ट्रातील राजकारणात त्यांनी दिलेले योगदान व सर्व बाबींचा या प्रकरणात अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण चौथे -

राजीव सातव यांचे सामाजिक कार्यातील योगदान :

प्रस्तुत प्रकरणांमध्ये राजीव सातव यांनी राजकीय कार्यात ज्याप्रकारे योगदान दिले आहे. त्याचप्रमाणे त्यांनी सामाजिक कार्यात सुध्दा योगदान दिले आहे. राजकीय नेतृत्वा बरोबर त्यांनी सामाजिक लोकांच्या अडी अडचणी जाणून घेऊन त्यांना न्याय मिळवून देण्याचे कार्य केले आहे. सामाजिक कार्यात बघितलं तर महिला सबलीकरण असो किंवा शेतकऱ्यांच्या अडीअडचणी असो किंवा आदिवासी समाजातील अडीअडचणी इत्यादी बाबतीत त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याचा योगदानाचा अभ्यास या प्रस्तुत प्रकरणात केला जाणार आहे.

प्रकरण पाचवे -

सामुग्रीचे विश्लेषण :

प्रस्तुत प्रकरणामध्ये राजकीय नेतृत्वाचे अध्ययन विशेष संदर्भ : राजीव सातव यांच्या राजकीय नेतृत्वाचे अध्ययन या विषयास अनुसरुन या संशोधन कार्यात आवश्यक असणारी प्राथमिक स्त्रोत साधनाची अनुभवजन्य पध्दतीचा वापर करुन यात राजीव सातव यांच्या परीवारातील व त्यांच्या सोबत काम केलेल्या लोकप्रतिनिधी यांच्या मुलाखती त्याचबरोबर त्यांच्या कडून प्रश्नावली अनुसुची या गोष्टी करुन घेऊन त्यांचा समावेश या संशोधनात केला जाईल व त्याच बरोबर दुय्यम स्त्रोतातील आवश्यक असणारी संदर्भग्रंथ नियतकालिके, मासिके, वृत्तमानपत्रे, भाषण त्याचबरोबर विधानसभा, लोकसभा व राज्यसभा या सभागृहात केलेले काम यांची माहिती

घेऊन त्यांचा समावेश यात केला जाईल आणि वेगवेगळया संशोधकांनी सादर केलेले पी.एच.डी. शोधप्रबंध तसेच या विषयास अनुसरुन वेगवेगळ्या लेखकांनी सादर केलेली पुस्तक प्रकाशने शासनाचे प्रकाशीत होणारे मासिक यासर्व संदर्भ ग्रंथातील घटकांचे सुक्ष्म अध्ययन करुन त्यांचा समावेश या संशोधनात केला जाईल व या संशोधनातून एक विश्लेषणात्मक शोधप्रबंध तयार करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे -

सारांश निष्कर्ष शिफारशी :

संशोधन प्रबंध यांच्या या शेवटच्या प्रकरणांमध्ये अनुक्रमानुसार सर्व प्रकरणाचा सारांश व उपसंहार प्रकट केलेल्या संशोधनाच्या अंती हाती आलेले ठळक निष्कर्ष प्रतिपादन करण्यात येणार आहे. त्याचबरोबर काही मोजक्या शिफारशी सुचवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

संदर्भ ग्रंथ :

1. प्रा.र.घ. वराडकर : पाश्चात्य व भारतीय राजकीय विचार, के सागर प्रकाशन.
2. डॉ. खेकाले : राजकीय नेतृत्व, मंगेश प्रकाशन, नागपूर.
3. आगलावे प्रदिप : संशोधन पध्दती शास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर.
4. वृत्तपत्रे, मासिके, सकाळ, लोकमत.
5. इंटरनेट.
6. आधुनिक राजकीय विश्लेषण, प्रशांत प्रकाशन, डॉ. प्रमोद पवार
7. विळेगावे व्यंकट, महाराष्ट्र शासन आणि जिल्हा प्रशासन.

संशोधक
वागदकर गजानन शंकर
एम.ए.राज्यशास्त्र, बी.एड, सेट

मार्गदर्शक
सहयोगी प्रा.डॉ. व्ही.आय.पाटील
संशोधन मार्गदर्शक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख
संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट
ता. जळकोट जि. लातूर